


पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंती निमित्त विनम्र अभिवादन! - संपादक

सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❏ वर्ष - ३ रे ❏ अंक - ११८ वा ❏ अमरावती (महाराष्ट्र) ❏ शनिवार दि. ३१ मे २०२५ ❏ संपादक - शुभांगी जोशी ❏ मुल्य - १ रु. ❏ पृष्ठ -६


## आम्ही घरात घुसून मारू, दहशतवाद्यांना मदत करणाऱ्यांना मोठी किंमत मोजावी लागेल ...मोदींचा पाकिस्तानला सज्जड दम

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१भोपाळ**

पंतप्रधान नरेंद्र मोदी शनिवारी मध्य प्रदेशातील भोपाळ येथे पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर महिला सक्षमीकरण महासंमेलनात सहभागी झाले आणि अनेक प्रकल्पांची सुरुवात केली. याच दरम्यान जाहीर सभेला संबोधित करताना मोदी म्हणाले की, ऑपरेशन सिंदूर हे दहशतवादाविरुद्धचं सर्वात मोठं ऑपरेशन आहे. आपल्या सैन्याने दहशतवाद्यांचे अड्डे उद्ध्वस्त केले आहेत.



पहलगाममध्ये दहशतवाद्यांनी केवळ भारतीयांचं रक्त सांडलं नाही तर त्यांनी आपल्या संस्कृतीवर हल्ला करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांनी आमच्या समाजात फूट पाडण्याचा प्रयत्न केला. दहशतवाद्यांनी भारताच्या नारीशक्तीला आव्हान दिलं आहे. हे आव्हान दहशतवाद्यांसाठी आणि त्यांच्या आकांसाठी काळ ठरलं आहे. ऑपरेशन सिंदूर हे भारताच्या इतिहासातील दहशतवाद्यांविरुद्धचं सर्वात मोठं आणि सर्वात यशस्वी ऑपरेशन आहे असं पंतप्रधानांनी म्हटलं आहे. आता आम्ही घरात घुसूनही मारू आणि दहशतवाद्यांना मदत करणाऱ्यांनाही त्याची मोठी किंमत मोजावी लागेल. भारतातील प्रत्येक नागरिक म्हणत आहे की, जर तुम्ही गोळी झाडली तर गोळीचं उत्तर गोळीनेच दिलं जाईल.पाकिस्तानी सैन्याने याचा विचारही केला नव्हता, तिथे जाऊन आमच्या सैन्याने दहशतवाद्यांचे अड्डे उद्ध्वस्त केले. सिंदूर हे आमच्या परंपरेचं प्रतीक आहे, आता ते भारताच्या शौर्याचं प्रतीक आहे

### 'ऑपरेशन सिंदूर हे नारीशक्तीच्या सामर्थ्याचं प्रतीक'

ऑपरेशन सिंदूर हे आपल्या नारीशक्तीच्या सामर्थ्याचं प्रतीक बनलं आहे. आपल्या सर्वांना माहिती आहे की, या ऑपरेशनमध्ये बीएसएफने खूप मोठी भूमिका बजावली आहे. बीएसएफच्या मुली काश्मीरपासून गुजरातपर्यंत जबाबदारी घेत होत्या. त्यांनी सीमेपलीकडून होणाऱ्या गोळीबाराला प्रत्युत्तर दिलं आहे. बीएसएफच्या शूर कन्यांनी अद्भुत शौर्य दाखवलं आहे. संपूर्ण जग मुलींचे शौर्य पाहत आहे असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे.

## प्रत्येक जामिनाला विरोध करण्याची मानसिकता बदला, हायकोर्टाकडून राज्य सरकारला समज

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१मुंबई**

प्रत्येक आरोपीच्या जामिनास विरोध करणारी मानसिकता सरकारी वकील, पोलीस, तपास यंत्रणा आणि पर्यायानं राज्य सरकारनं बदलायला हवी, असं स्पष्ट मत मुंबई उच्च न्यायालयानं एका निकालात व्यक्त केलं आहे.



खटला जलदगतीने संपणं हा प्रत्येक आरोपीचा संविधानिक अधिकार आहे. कायद्यात तशी तरतूदच करण्यात आलेली आहे. सर्वोच्च न्यायालयानंही याची वारंवार आठवण करून दिलेली आहे. खटला प्रलंबित राहण्याचे खापर प्रत्येक वेळी पोलिसांवरच फोडता येणार नाही, कधी कधी परिस्थिती त्यांच्याही हाताबाहेर असते. पण जामिनावर निर्णय देताना खटला रेंगाळल्याचा मुद्दा सरकारी पक्षानं आणि कनिष्ठ न्यायालयानंही ग्राह्य धरायला हवा, असं न्यायमूर्ती मिलिंद जाधव यांनी एका निकालात स्पष्ट केलंय. तसेच राज्यातील कारागृहांची अवस्था आणि तिथं असलेल्या कैद्यांची संख्या हा मुद्दाही कोर्टानं अधोरेखित केला आहे.

पोस्कोचा खटला एक वर्षात संपायला हवा, अशी कायद्यात तरतूद केलीय. तरीही पोस्कोचे अनेक खटले गुन्हा घडून पाच वर्षांपर्यंत सुरूच होत नाही. अशा परिस्थितीतदेखील सरकारी पक्ष गुन्ह्याची तीव्रता सांगून जामिनाला जोरदार विरोध करतो, असे खडेबोल यावेळी न्यायालयाने सुनावले.

## संघ, आई आणि विद्यार्थी परिषद यांनी मला घडवले : नितीन गडकरी

### गडकरी यांच्या 'संघातील मानवी व्यवस्थापन' पुस्तकाचे प्रकाशन सोहळा थाटात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१नागपूर**

लोक आधी भारतावर विश्वास ठेवत नव्हते. परंतु, अलीकडच्या काही घडामोडींमधून क्षमता सिद्ध झाल्यामुळे लोक भारतावर विश्वास ठेवायला लागले आहेत. परिणामी, जगाचाही भारतावरील विश्वास वाढला आहे. भारत अशक्य ते शक्य करू शकतो, हे सर्वांना कळून चुकले आहे, असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अखिल भारतीय प्रचारप्रमुख सुनील आंबेकर यांनी केले.



केंद्रीय भूपृष्ठ वाहतूकमंत्री नितीन गडकरी यांच्या 'संघातील मानवी व्यवस्थापन' या पुस्तकाचे शुक्रवारी आंबेकर आणि ज्येष्ठ संपादक व विचारवंत विवेक घळसासी यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. हा कार्यक्रम राजहंस प्रकाशन व मंथन व्यासपीठ यांच्या संयुक्त विद्यमाने गोरेपेठेतील वनामती सभागृह येथे आयोजित करण्यात आला होता. व्यक्तिगत व सार्वजनिक जीवनामध्ये चारित्र्याला खूप महत्व आहे. देशामध्ये आधी शुद्ध चारित्र्याचे लोक होते. त्यामुळे हा देश हजारो वर्षापर्यंत एकसंघ राहू शकला. म्हणूनच संघ चारित्र्यवान व्यक्ती निर्माण करण्याचे कार्य करतो. असे व्यक्तीच देशाला सर्वश्रेष्ठ बनवू शकतात. स्वतःच्या स्वार्थाचा विचार करणाऱ्यांमुळे परिवारच एकत्र राहू शकत नाही, देश व संघटना तर दूरची गोष्ट आहे, असेही आंबेकर यावेळी म्हणाले.

माझ्याकरिता राष्ट्रच सर्वोतोपरी असून, ते समृद्ध व्हावे, हीच माझी नेहमी इच्छा असते, अशी भावना नितीन गडकरी यांनी व्यक्त केली. माझे जीवन आई, संघ आणि विद्यार्थी परिषदेमुळे घडले. कार्य, कर्तृत्व, जीद्द, चिकाटी, संवेदनशीलता, सहृदयता, समभाव आदी गुण या तिघांमुळेच मिळाले. त्यातून मी देशहिताकरिता उल्लेखनीय कामे करू शकलो. देश व समाजाकरिता काम करण्याची इच्छा असली की काहीच अशक्य राहत नाही. जगात जे काही चांगले आहे, ते सर्व भारतात आले पाहिजे आणि सर्वजन सुखी झाले पाहिजे, असे मला नेहमी वाटते, असे गडकरी यांनी सांगितले. विचारशून्यता ही आज देशाची मोठी समस्या आहे, अशी खंतही त्यांनी व्यक्त केली.


## राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी लवकरच चौंडीत येतील : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

### पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीच्या निमित्ताने अहिल्यानगरमधील चौंडीत भव्य कार्यक्रम

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१अहिल्यानगर**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीच्या निमित्ताने आज अहिल्यानगरमधील चौंडीत भव्य कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमासाठी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सभापती राम शिंदे यांच्यासह आदी नेते उपस्थित होते. या कार्यक्रमात बोलताना देवेंद्र फडणवीस यांनी विविध विषयांवर भाष्य केलं.

अहमदनगर जिल्ह्याचं नाव अहिल्यानगर करण्याचा निर्णय आपण एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील सरकार असताना घेतला. खरं म्हणजे राम शिंदे आणि आम्ही देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना आजच्या कार्यक्रमासाठी निमंत्रित केलं होतं. यासाठी मी जेव्हा पंतप्रधान मोदी यांना भेटलो आणि सांगितलं की पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त




कार्यक्रमासाठी निमंत्रित केलं. तेव्हा पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की माझ्यासमोर हा प्रश्न आहे की एकीकडे जन्मस्थळ आणि दुसरीकडे कर्मस्थळ. मोदींनी सांगितलं की यावेळी मी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या राजधानीत कर्मस्थळावर सभा घेण्याचं ठरवलं आहे. मात्र, पुढच्यावेळी जन्मस्थळावर नक्की येईल. असा निश्वास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिला आहे, असं देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे.पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त मध्य प्रदेशात देखील मोठा कार्यक्रम पार पडत आहे. या कार्यक्रमाला पंतप्रधान मोदी उपस्थित होते. आम्ही आजच्या कार्यक्रमासाठी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना देखील निमंत्रित करण्याचा प्रयत्न केला. पण आम्हाला थोडा उशीर झाला होता. मात्र, तरीही मला विश्वास आहे की पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या दर्शनासाठी लवकरच राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी येतील, असंही देवेंद्र फडणवीस यावेळी म्हणाले आहेत.

## कृषिमंत्रिपद म्हणजे ओसाड गावची पाटीलकीच अन् मला हे खातं दिलंय; माणिकराव कोकाटेंचं पुन्हा वादग्रस्त वक्तव्य

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१छ.संभाजी नगर**

राज्यात अवकाळी पावसामुळे शेतमालाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून, शेतकरी आता मदतीच्या आशेने सरकारकडे पाहत आहेत. त्यातच कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांनी नुकतेच एक वादग्रस्त विधान केले होते. नाशिक जिल्ह्याच्या सिन्नर तालुका दौऱ्यात नुकसानग्रस्त शेतीची पाहणी करताना त्यांनी ढेकळांचे पंचनामे करायचे का? असे वक्तव्य करून शेतकऱ्यांच्या भावना दुखावल्या. माणिकराव कोकाटे यांच्या वक्तव्यावरून विरोधकांनी त्यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला होता. आता माणिकराव कोकाटे यांनी पुन्हा एकदा वाद निर्माण करणारे वक्तव्य करून टीकेला आमंत्रण दिल्याचे दिसत आहे.



'कृषिमंत्रिपद म्हणजे ओसाड गावची पाटीलकीच आहे आणि मला हे खाते दिले आहे', असे विधान माणिकराव कोकाटे यांनी शुक्रवारी छत्रपती संभाजीनगरमध्ये केले. अ. भा. बळीराजा संघटना भारततर्फे एमजीएमच्या आर्यभट्ट सभागृहात शेतकऱ्यांच्या गुणवंत पाल्यांच्या सत्कार समारंभात ते बोलत होते. तर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान हे शेतकऱ्यांना जास्तीत जास्त मदत करत आहेत. दोन दिवसांपूर्वी केंद्र सरकारने १७ पिकांसाठी सुमारे दीडपट हमीभाव जाहीर केला आहे. मुख्यमंत्री फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवार हे शेतकऱ्यांच्या हितासाठी प्रयत्नशील आहेत. अजित पवार यांनी मला हे कृषी खाते जाणीवपूर्वक दिले आहे. शेतकऱ्यांच्या मुलांनी शेतीविषयक शिक्षण घेऊन, शेती आधारित व्यवसायात करिअर करावे, असा सल्ला देखील त्यांनी यावेळी शेतकऱ्यांना दिला आहे. आता माणिकराव कोकाटे यांच्या वक्तव्यानंतर नव्या वादाला तोंड फुटण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## संभाजी महाराजांच्या नावाने लव्ह जिहादचा कायदा करा, गोपीचंद पडळकर यांची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१अहिल्यानगर**

स्थानिक स्वराज्य संस्थांमधील आरक्षण तसेच ओबीसी आरक्षण कोट्यात मराठा समाजाचा समावेश करण्याची केली जाणारी मागणी या दोन बाबींमुळे ओबीसी आरक्षणाचा मुद्दा कायमच चर्चेत राहिलेला आहे. राज्यातील अनेक ओबीसी नेत्यांनी या दोन्ही मुद्द्यांमध्ये आपली सक्रीय भूमिका बजावलेली आहे. यात भाजपाचे नेते गोपीचंद पडळकर यांचेही नाव आहे. त्यांनी पुन्हा एकदा ओबीसी आरक्षमावर भाष्य केलंय. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ओबीसी आरक्षण टिकवले, असं त्यांनी म्हटलंय. तसेच त्यांनी धर्मांतर आणि लव्ह जिहाद



कायद्यावरही मोठी मागणी केलीय. संभाजी महाराज यांच्या नावाने लव्ह जिहाद कायदा करावा, अशी मोठी मागणी त्यांनी केलीय.

गोपीचंद पडळकर हे अहिल्यानगरमध्ये बोलत होते. यावेळी बोलताना त्यांनी वरील मागणी केली. मी आज काहीही मागणार नाही पण आरक्षणाचा विचार सर्वांच्या मनात आहे. ओबीसींचे गेलेले आरक्षण एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस यांनी टिकवले. बाजीप्रभूप्रमाणे आम्ही सगळे प्रामाणिक आहोत. जे लढायचे ते समोरासमोर लढणारे आम्ही आहोत, असं गोपीचंद पडळकर म्हणाले.

## बुलढाण्यात मस्साजोगची पुनरावृत्ती ?

### भाजप कार्यकर्ता पंकज देशमुख मृत्यू प्रकरणाला वेगळं वळण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१बुलढाणा**

बीडमधील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येनं संपूर्ण महाराष्ट्र हादरला होता. आता बुलढाण्यात देखील एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. भाजपा कार्यकर्ता पंकज देशमुख यांची आत्महत्या नसून घातपात असल्याची तक्रार पंकज देशमुख यांची पत्नी सुनीता देशमुख यांनी केली आहे. तसेच पंकज देशमुख यांच्या मृत्यूची सीआयडी चौकशीची मागणी देखील सुनीता देशमुख यांनी केली



आहे.

बुलढाणा जिल्ह्यातील जळगाव जामोद येथील भाजप कार्यकर्ता आणि भाजप आमदार संजय कुटे यांचा वाहनचालक पंकज देशमुख मृत्यू प्रकरणाला आता नवीन वळण आलं आहे. ३ मे रोजी जळगाव जामोद येथील बऱ्हाणपूर रोडवरील एका शेतात पंकज देशमुख यांचा मृतदेह रुमालाला लटकलेल्या अवस्थेत आणि संशयास्पद स्थितीत आढळला होता. त्यावेळी पंकज देशमुख यांच्या हातावर पायावर आणि मानेवर अनेक जखमाही आढळल्या होत्या.

जळगाव जामोद पोलिसांनी मृतदेहाचं शवविच्छेदन अकोला येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या रुग्णालयात केलं असं असलं तरी पंकज देशमुख यांचा मृत्यू संशयास्पद असल्याची चर्चाही जळगाव जामोद परिसरात होत होती. मात्र, आता पंकज देशमुख यांच्या पत्नी सुनीता देशमुख यांनी विशेष पोलीस महानिरीक्षक अमरावती आणि बुलढाणा पोलीस अधीक्षकांकडे तक्रार करून पंकज देशमुख यांची आत्महत्या नसून त्यांच्यासोबत घातपात झाल्याची तक्रार केली आहे. सोबतच जळगाव जामोद पोलिसांचा तपास हा संशयास्पद असून जळगाव जामोद पोलिसांवर माझा विश्वास नाही, असं म्हटलं आहे. त्यामुळे माझ्या पतीच्या मृत्यूची सीआयडी चौकशी करावी अशी मागणी केली आहे. त्यामुळे आता या प्रकरणाला नवीन गंभीर वळण मिळालं आहे.

## संपादकीय ......

# प्रजाहितदक्ष पुण्यश्लोक अहिल्यादेवी

लोककल्याणकारी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी धर्मभेद, वर्णभेद, जातिभेद मोडून काढला. मानवतावादी दृष्टिकोन त्यांनी सदैव आचरणात आणला. आज अहिल्यादेवी यांची ३०० वी जयंती साजरी होत आहे. त्यानिमित्ताने...

अहिल्यादेवी होळकर यांचा जन्म अहिल्यानगर (अहमदनगर) जिल्ह्यातील चौंडी या गावातील माणकोजी शिंदे यांच्या घरी ३१ मे १७२५ रोजी झाला. हा भाग नेहमीच दुष्काळी आणि राजकीयदृष्ट्या मागासलेला भाग म्हणून त्यावेळी प्रसिद्ध होता. ही परिस्थिती अहिल्यादेवी यांनी त्यांच्या कार्यसेवेतून पुढे बदलली. त्यांनी सजवलेली अहिल्यानगरी आज मोठ्या दिमाखात पाहताना, अनुभवताना वेगळे समाधान वाटते. बाजीराव पेशव्यांचे सुभेदार मल्हारराव होळकर यांचे चिरंजीव खंडेराव होळकर यांच्यासोबत १७३३ मध्ये त्यांचा विवाह झाला.

सासरे मल्हारराव होळकर यांच्या घरी मोकळे वातावरण असल्याने पुराण वाचन, व-तवैकल्य यामध्ये आणि राजकारणाचे धडे घेण्यामध्ये त्यांचा बराच वेळ जात होता. पण हा आनंद फार काळ नियतीला मान्य नव्हता. सुरजमल जाट आणि होळकर यांच्यात झालेल्या युद्धात खंडेराव होळकर यांचे १९ मार्च १७५४ रोजी निधन झाले; तर सासरे मल्हारराव होळकर यांचे १७६६ मध्ये निधन झाले आणि अहिल्यादेवींच्या जीवनात अंधार पसरला. पित्याची ममता आणि जिव्हाळा देणारा सासरा गेल्यानंतर राज्यकारभाराची संपूर्ण जबाबदारी अहिल्यादेवी यांच्यावर आली. होळकर घराण्याची राजधानी इंदूर होती. महेश्वरी हे प्राचीन नगर आज अहिल्यानगर या नावाने प्रसिद्ध आहे. हजारो पर्यटक अहिल्यादेवी यांच्या जन्मगावी चौंडी येथे ३१ मे (जयंती) रोजी एकत्र येत असतात.

अहिल्यादेवी यांचा चौंडी येथील वास्तव्याचा पुरावा म्हणजे सध्याचा राजवाडा आणि तेथील परिसर होय. भारतात अनेक तीर्थक्षेत्रस्थळी त्यांनी घाट बांधले आहेत. भाविकांसाठी बांधलेल्या धर्मशाळांचे अनेक पुरावे सध्या उपलब्ध आहेत. अहिल्यादेवी यांचे कार्य डोळसपणे पाहणे म्हणजेच त्यांचे कार्य समजून घेणे होय. धर्माची विविध अंगे आणि धर्मपरायणता दूरदृष्टीपणे जतन करणारी देवी, उत्कृष्ट प्रशासक म्हणून त्यांची ओळख आहे. जातिभेद नष्ट करण्यासाठी स्वतः त्यांनी कृती आराखडा तयार केला.

धर्मभेद, वर्णभेद, जातिभेद मोडून काढला. मानवतावादी दृष्टिकोन सदैव आचरणात आणला. आपल्या राज्यातील पशू-पक्षी यांचीही काळजी करणार्या व स्वतःच्या पतीलाही पाच मोहरा दंड शिक्षा ठोठावणार्या, स्वतःच्या खजिन्यातून संस्थानातील तीर्थस्थळांचा जीर्णोद्धार करणार्या, राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची इतिहासात नोंद आहे. इंग्रज इतिहासकार जॉन माल्कम अहिल्यादेवी यांच्याविषयी म्हणतो की, हिंदुस्थानातील लोक या अहिल्या यांना देवी म्हणतात. त्या लढाऊ वृत्तीच्या होत्या. सर्वसामान्यांना न्याय देण्यासाठी दरबारात सिंहासनावर बसत होत्या. त्यांच्या न्यायनिवाड्याची अनेक उदाहरणे प्रसिद्ध आहेत. कोणताही भेदाभेद न करता त्या न्यायनिवाडा करत होत्या.

रयतेला त्रास देणारे लुटारू, ठग, चोर, गुंडांचा पूर्ण बंदोबस्त करूनच त्या शांत बसल्या. त्यांच्या राज्यात जनता सुखी-समाधानी आणि समृद्ध होती. अहिल्यादेवी चाणाक्ष आणि चतुर राज्यकर्त्या होत्या. नात्यागोत्याचे व्यवहार आणि राजकारण त्यांनी कधीच केले नाही. जाट, भिल्ल, रामोशी या जमातींचा उपयोग त्यांनी स्वराज्य रक्षणासाठी करून घेतला. गोरगरिबांची काळजी त्या घेत होत्या. संस्थानातील प्रजेला जाण्या-येण्यासाठी संस्थान खर्चातून रस्ते तयार केले. रस्त्याच्या दुतर्फा झाडे लावून पर्यावरण रक्षणाचा संदेश त्यांनी रयतेला दिला. चिंचवड, चिखलदरा, रामेश्वर वृंदावन, पंढरपूर येथे त्यांनी अन्नछत्रे उभारली. अनेक तीर्थस्थळे आणि मंदिरांचा त्यांनी जीर्णोद्धार केला आहे. काशी, वाराणसी, पंढरपूर येथे त्यांनी अन्नछत्रे आणि धर्मशाळा बांधल्या आहेत. जयंतीनिमित्ताने त्यांच्या या कार्याचा आणि विचारांचा जागर व्हावा हीच अपेक्षा.

# आज जागतिक तंबाखू नकार दिवस
# तंबाखू सोडा, आरोग्य निवडा




तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थ खाण्याचे प्रमाण तरुणांमध्ये खूप मोठ्या प्रमाणात वाढलेले आहे. तंबाखूचे उत्पादन आणि सेवन यामध्ये भारताचा दुसरा क्रमांक लागतो. मात्र त्यामुळे होणाऱ्या तोंडाच्या कॅन्सरसाठी पहिला क्रमांक लागतो. ६३ टक्के मृत्यू हे असंसर्गजन्य आजार जसे उच्च रक्तदाब, मधूमेह, तोंडाचा, स्तन, गर्भाशय मुखाचा कर्करोग, पक्षाघात, फुफ्फुसाचे आजार आदीमुळे होत आहेत. यासाठी मुख्यता चार ते पाच घटक कारणीभूत आहेत. हे घटक म्हणजे असंतुलित आहार, व्यायामाचा अभाव, मद्याचे अतिप्रमाणात सेवन, तंबाखूजन्य पदार्थाचे व्यसन आणि ताणतनाव हे आहे. जर या कारणावर आपण नियंत्रण ठेवले, तर या आजारामुळे होणारे ७०-८० टक्के मृत्यू टाळू शकतो.दरवर्षी ३१ मे हा जागतिक तंबाखू नकार दिवस म्हणून साजरा करण्यात येतो. जास्तीत जास्त लोकांमध्ये तंबाखूच्या दुष्परिणामांबद्दल जनजागृती करून लोकांना तंबाखूसारख्या वाईट व्यसनापासून दूर करणे, हा या कार्यक्रमाचा उद्देश आहे. यावर्षीचे या दिवसाचे घोषवाक्य आहे 'आकर्षणाचा मुखवटा उतरवूया : तंबाखू आणि निकोटीन उत्पादनामागील उद्योगांच्या क्लुप्त्या उघड करूया' आहे. शासन तंबाखूजन्य पदार्थाचे व्यसन कमी व्हावे म्हणून विविध मार्गांनी उपाययोजना करत असते. परंतु तंबाखू बनवणाऱ्या कंपन्या त्यामध्ये पळवाटा शोधून वेगवेगळ्याप्रकारे जाहिरात करून तरुणांना आकर्षित करण्याचा प्रयत्न करत असतात. ज्यापैकी सिगारेटला पर्याय म्हणून इलेक्ट्रॉनिक सिगारेट हा देखील एक प्रकार बाजारात उपलब्ध होता. ज्यावर राज्य शासनाने तत्काळ बंदी घातली आहे. अश्या व्यसनांमुळे प्रत्यक्ष अप्रत्यक्षरित्या होणाऱ्या असंसर्गजन्य आजारांवर शासनाचा मोठ्या प्रमाणात खर्च होत आहे. असंसर्गजन्य आजार होण्यासाठी तंबाखू देखील कारणीभूत आहे. त्यामुळे जनजागृतीच्या, शाळेतील मुलांना मार्गदर्शन, कार्यशाळा, सोशल मिडिया, कोपटा २००३ कायदा व इतर माध्यमातून तंबाखूच्या वितरण व विक्रीवर शासनाकडून विविधप्रकारे कार्यवाही आणि जनजागृती करण्यात येत आहे. याचाच भाग म्हणून शासनाने कोपटा २००३ कायद्याची तरतूद केली आहे.कोपटा २००३ कायद्यातील कलम कलम ४ अंतर्गत सार्वजनिक धुम्रपानास बंदी केली आहे. कलम ५ अंतर्गत तंबाखूच्या प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष जाहिरातीवर बंदी. कलम ६ अ अंतर्गत १८ वर्षाखालील मुलांना तंबाखू विकणे किंवा त्यांच्याकडून विक्री करून घेण्यावर बंदी. कलम ६ ब अंतर्गत शैक्षणिक संस्थेच्या १०० मीटर परिसरात तंबाखू विकण्यास बंदी. कलम ७ अंतर्गत तंबाखूजन्य पदार्थाच्या वेष्टन, पाकिटावर चित्रमय धोक्याची सूचना बंधनकारक आहे. यासोबतच १० जुलै २०२३ च्या राज्य शासनाच्या निर्णयानुसार सर्व शासकीय, निमशासकीय, खासगी कार्यालये तंबाखुमुक्त करावयाचे आहे.शासकीय इमारतीच्या प्रवेशद्वाराजवळ 'या कार्यालयाच्या १०० यार्ड परिसरात तंबाखू तथा तंबाखू जन्य पदार्थ विक्री करणे व बाळगणे हा कायद्याने गुन्हा आहे' असा फलक. इमारतीच्या इतर द्वारावर जिथून इमारती मध्ये प्रवेश होतो, तसेच प्रत्येक मजल्यावर लिफ्टशेजारी आणि विविध भागामध्ये 'या परिसरामध्ये तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थ सेवन करणे तथा बाळगणे कायद्याने गुन्हा आहे.याचे उल्लंघन केल्यास २०० रुपये दंड आकारण्यात येईल' अशाप्रकारचे फलक लावण्यास सूचित केले आहे.कायद्यामुळे तंबाखूच्या विक्री आणि वापर, तसेच जाहिरातींवर बंधने आली आहेत. त्यामुळे तंबाखूजन्य पदार्थांचा खप वाढविण्यासाठी तंबाखू उद्योगांकडून जाहिरातीच्या वेगवेगळ्या पर्यायांचा वापर करून मुलांना आकर्षित करण्यात येते. सोशल मिडीयाच्या माध्यमातून, ई-सिगारेटची चुकीची जाहिरात करून, गुटख्याच्याऐवजी पानमसाला जाहिरात करून तरुणांना प्रोत्साहन देण्यात येते. जेणेकरून तो तरुण आयुष्यभर तंबाखूचा वापर करत राहील. तंबाखूचा व्यवसाय वाढत राहील. अशा वाईट व्यसनापासून तरुणांना वाचविण्यासाठी आणि यावर अंकुश लावण्यासाठी अन्न व औषधी विभाग, पोलिस, शाळा, कामगार विभाग, विक्रीकर विभाग, कृषी विभाग, दंत व वैद्यकीय महाविद्यालये, स्वयंसेवी संस्था व इतर विभागांनी पुढाकार घेऊन, तसेच पालकांनी जागरूक राहून तंबाखूला आळा घालण्यास मदत करावी, असे आवाहन आरोग्य विभाग, जिल्हा सामान्य रुग्णालयातर्फे करण्यात आले आहे.




## शरीरातील 'ही' लक्षणं ओरडून ओरडून सांगतात वाढणार आहे लठ्ठपणा, कसा कराल बचाव?

**दि ३१ विदर्भ प्रजासत्ताक**

लठ्ठपणा आज जगभरात एक मोठी समस्या बनत चालला आहे. एकदा का लठ्ठपणा वाढला की, फिगर तर बिघडतोच, सोबतच शरीरात वेगवेगळे आजारही घर करतात. एकदा वाढलेला लठ्ठपणा कमी करणं काही खायचं काम नसतं. लठ्ठपणा कुणालाच नको असतो. पण याच्या सुरूवातीच्या लक्षणांकडे दुर्लक्ष केलं तर लठ्ठपणा काही तुमचा पिच्छा सोडत नाही. अशात लठ्ठपणा वाढणार असेल तर शरीरात दिसणाऱ्या काही लक्षणांकडे अजिबात दुर्लक्ष करू नये. अशाच काही लक्षणांबाबत आज आम्ही तुम्हाला सांगणार आहोत.

ज्याप्रमाणे आपल्याला जर एखादा आजार झाला असेल तर शरीरात वेगवेगळी लक्षणं दिसतात. तशीच काही लक्षणं वजन वाढण्याआधी दिसू लागतात. ज्यांकडे सामान्यपणे सगळेच दुर्लक्ष करतात. मग हेच दुर्लक्ष करणं तुम्हाला पुढे जाऊन महागात पडतं.अशात आज आम्ही लठ्ठपणा वाढत असल्याच्या काही लक्षणांबाबत आम्ही तुम्हाला माहिती देणार आहोत. जेणेकरून तुम्ही यापासून बचाव करू शकाल किंवा वजन कमी करू शकाल.

**कंबरेचा घेर वाढणं**- जेव्हा आपल्या शरीरात फॅट वाढू लागतं तेव्हा सामान्यपणे सगळ्यात आधी कंबरेच्या आजूबाजूला ते दिसू लागतं. अशात तुम्हाला सुद्धा तुमच्या कंबरेचा घेर वाढल्याचं जाणवत असेल, वजन कमी करण्याचं प्लानिंग लगेच करा. जराही उशीर कराल तर पुढे पश्चाताप होईल.

**सतत थकवा**- चांगला पौष्टिक आहार घेऊन, रोज वेळेवर जेवून आणि पुरेशी झोप घेऊनही तुम्हाला सतत थकवा जाणवत असेल तर तुम्ही वजन कमी करण्यावर भर दिला पाहिजे.

**झोपेत घोरणं**- जेव्हा आपल्या मानेच्या किंवा छातीच्या आजूबाजूला फॅट वाढतं, तेव्हा यामुळे श्वास घेण्यास समस्या होते. याच कारणानं रात्री




अनेक लोक घोरतात.

**जॉइंटमध्ये वेदना**- वजन वाढल्यावर जॉइंट खासकरून गुडघे, कंबर आणि पाठीच्या खालच्या भागावर जास्त प्रेशर येतो. त्यामुळे या भागांमध्ये नेहमीच वेदना होतात. अशात तुम्ही लगेच वजन कमी करण्यासाठीचे प्रयत्न केले पाहिजे.

**पुन्हा पुन्हा खाण्याची इच्छा**

वजन वाढल्यामुळे हार्मोन्समध्येही असंतुलन होतं, ज्यामुळे तुम्हाला पुन्हा पुन्हा खाण्याची इच्छा होते. तुम्हाला सुद्धा जेवण केल्यावरही काही खाण्याची इच्छा होत असेल तर लगेच वजन कमी करण्यास सुरूवात करा.

वर सांगण्यात आलेली लक्षणं जर तुमच्या शरीरातही दिसत असतील तर तुम्ही लगेच प्रोसेस्ड फूड्स आणि शुगर घेणं कमी केलं पाहिजे. हेल्दी डाएट आणि एक्सरसाईज केला पाहिजे. असं केलं नाही तर काही महिन्यात तुम्ही सुद्धा लठ्ठपणाचे शिकार व्हाल आणि नंतर वेगवेगळ्या आजारांचे शिकार व्हाल.

# तण नियंत्रण आच्छादन, फळ पिकांकरिता कव्हर व हायड्रोपोनिक्ससाठी मिळतंय अनुदान; वाचा सविस्तर

**दि.३१ विदर्भ प्रजासत्ताक**

एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान अंतर्गत हरीतगृह, शेडनेटगृह, प्लास्टिक मल्चींग या घटकांचे मापदंड तसेच क्षेत्र मर्यादा उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये सुधारित करण्यात आलेल्या आहेत.

तसेच सन २०२५-२६ मध्ये फळ पिकांकरिता फळांना किंवा फळांच्या घडांना कव्हर,तण नियंत्रक आच्छादन,हायड्रोपोनिक्स व एरोपोनिक्स हे घटक नव्याने अंतर्भुत करण्यात आलेले आहेत.

तसेच सन २०२५-२६ या वर्षात संरक्षित शेती घटकांतर्गत वरील घटकांची महाडीबीटी प्रणालीवर अनुदान तत्वावर अंमलबजावणी करण्यात येत आहे.जास्तीत जास्त शेतकऱ्यांना या घटकाचा लाभ होण्यासाठी महाडीबीटी या संगणकीय प्रणालीवर संरक्षित शेती घटकांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध घटकांचे अर्ज घेणेबाबत आवाहन करणेकरीता सोबत सहपत्रित केलेल्या प्रेस नोटची आपले स्तरावरून विनामुल्य प्रसिद्धी सर्व जिल्ह्यांमध्ये करावी. वातावरण बदलाच्या पार्श्वभूमीवर पिकास पोषक वातावरण निर्मिती करुन उच्च दर्जाचा भाजीपाला व फुलपिके घेण्यासाठी संरक्षित शेती तंत्रज्ञानाचा उत्तम पर्याय उपलब्ध आहे.

हरितगृह व शेडनेटगृहाच्या वापरामुळे फुले व भाजीपाला पिकांचे निर्यात योग्य गुणवत्तेच्या मालाचे उत्पादन होत असून त्यापासून शेतकऱ्यांना कमी क्षेत्रामध्ये खुल्या वातावरणाच्या तुलनेत ३ ते ४ पटीने उत्पादन घेता येते.त्यामुळे हरितगृह व शेडनेटगृह उभारणीकडे शेतकऱ्यांचा कल वाढत असून संरक्षित शेतीस मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळत आहे.

**लाभाच्या योजना**

- एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान.

- राष्ट्रीय कृषि विकास योजना.

खर्चाचा मापदंड, अनुदान मर्यादा व क्षेत्र मर्यादा

बाब प्रती चौ.मी. खर्चाचा मापदंड अपेक्षित खर्च ५०% देय अनुदान क्षेत्र मर्यादा

हरितगृह (जतझक)
रु. १००० ते १२०० ५ गुंठे - ६.० लाख
१० गुंठे - १०.५८ लाख
२० गुंठे - २०.८० लाख
२५ गुंठे - २५.०० लाख
५ गुंठे - ३.० लाख
१० गुंठे - ५.३८ लाख
२० गुंठे - १०.४० लाख
२५ गुंठे - १२.५० लाख
५०० चौ.मी. ते २५०० चौ.मी

हरितगृह (उउझक)रु. १५०० ते १८०० ५ गुंठे - ९.० लाख
१० गुंठे - १६.१२ लाख
२० गुंठे - ३१.२० लाख
२५ गुंठे - ३७.५० लाख
५ गुंठे - ४.५० लाख
१० गुंठे - ८.०६ लाख
२०गुंठे - १५.६० लाख
२५ गुंठे - १८.७५ लाख
५०० चौ.मी. ते २५०० चौ.मी

शेडनेटगृह रु. ७१०
५ गुंठे - ३.५५ लाख
१० गुंठे - ७.१८ लाख
२०गुंठे - १४.७६ लाख
२५ गुंठे - १७.७५ लाख
५ गुंठे - १.७७ लाख
१० गुंठे - ३.५९ लाख
२०गुंठे - ७.३८ लाख
२५ गुंठे - ८.८७ लाख
५०० चौ.मी. ते २५०० चौ.मी

प्लास्टिक मल्चिंग रु. ४.० ४०,००० प्रति हे. २०,००० प्रति हे. जास्तीत जास्त २ हे.

नव्याने समाविष्ट घटक

बाब प्रती चौ.मी. खर्चाचा मापदंड अपेक्षित खर्च ५०% देय अनुदान क्षेत्र मर्यादा

फळ पिकांकरिता फळांना/फळांच्या घडांना कव्हर (त्रींळीं ऊेंशी ऊीऊेंशी) रु. ५.० रु. ५०,०००/हे रु. २५,०००/हे जास्तीत जास्त २ हे.

तण नियंत्रक अच्छादन (थशशव चरीं) रु. ५०.०० रु. २०,००००/एकर रु. १०,००००/एकर जास्तीत जास्त ४००० चौ.मी

**हायड्रोपोनिक्स एरोपोनिक्स**

रु. ३५० रु. ३५,००००/१० गुंठे रु. १७,५०००/१० गुंठे जास्तीत जास्त १००० चौ.मी

* अनुसुचित क्षेत्रासाठी १५ टक्के अतिरिक्त खर्चाचा मापदंड देय आहे. योजनेत सहभागी होण्यासाठीशेतकऱ्यांनी लाभ घेण्यासाठी महाडीबीटी पोर्टल या संकेतस्थळावर फलोत्पादन या घटकाखाली अर्ज करावेत.

**आवश्यक कागदपत्रे**

ॲग्रीस्टॅक फार्मर आयडी, ७/१२ उतारा, ८-अ, आधार कार्डाची छायांकीत प्रत, आधार संलग्न बँक खात्याच्या पासबुकच्या प्रथम पानाची छायांकित प्रत, जात प्रमाणपत्र (अनु. जाती/अनु. जमाती शेतकऱ्यांसाठी), विहीत नमुन्यातील हमीपत्र, बंधपत्र, चतुःसीमा नकाशा इत्यादी.

**संपर्क**- अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषि विभागाच्या कार्यालयाशी संपर्क साधावा.




शेतकरी ते थेट ग्राहक
**कामधेनु नॅचरल्स**
उत्तम आहार सर्वोत्तम जीवन
विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी
समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बँकेच्या बाजुने देवरणकर नगर, अमरावती
नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०

# धारणी प्रकल्प कार्यालयाकडून योजनेच्या लाभासाठी अर्ज आमंत्रित

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.३१अमरावती,** धारणी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयातर्फे केंद्रवर्ती अर्थसंकल्प योजना सन २०२५-२०२६ अंतर्गत मंजूर योजनेच्या लाभासाठी अनुसूचित जातीच्या लाभार्थ्यांकडून ऑनलाईन अर्ज मागविण्यात आले आहे. यासाठी इच्छुकांनी अर्ज करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.आदिवासी शेतकऱ्यांना शेतीच्या संरक्षणाकरीता तारजाळी सोलर फेनसिंग ८५ टक्के, आदिवासी युवतींना ८५ टक्के अनुदानावर शिलाई मशिन खरेदी, आदिवासी शेतकरी लाभार्थ्यांना तुषार सिंचन संच ८५ टक्के, आदिवासी बचतगटांना ८५ टक्के अनुदानावर मंडप डेकोरेशन, डीजे साऊंड साहित्य खरेदी, आदिवासी महिला-पुरुष बचतगटांना ८५ टक्के अनुदानावर दालमिल उभारणी, अनुसूचित जमातीच्या बचतगटास ८५ टक्के अनुदानावर फिरते फास्ट फुड सेंटर, आदिवासी लाभार्थ्यांना ८५ टक्के अनुदानावर फिटींग, इलेक्ट्रीकल, ऑटोमोबाईल, सुतार काम व इतर व्यवसाय करण्यासाठी अर्थसहाय्य करणे, आदिवासी सुशिक्षित युवकांच्या बचतगटांना ८५ टक्के अनुदानावर संगणक संच, प्रिंटर, यूपीएस व तत्सम साहित्य, आदिवासी बेरोजगार लाभार्थ्यांना ८५ टक्के अनुदानावर पॉपकॉर्न मशिन साहित्य खरेदी, आदिवासी महिला-पुरुष बचतगटांना ८५ टक्के अनुदानावर बेकरी प्रोसेसिंग मशिन खरेदी, वैयक्तिक वनहक्क प्राप्त आदिवासी लाभार्थ्यांना ८५ टक्के अनुदानावर तारकुंपण, अनुसूचित जमातीच्या दिव्यांग लामार्थ्यांना स्वयंरोजगारासाठी १०० टक्के अनुदानावर अर्थसहाय्य, अनुसूचित जमातीच्या वैद्यकीय व अभियांत्रिकी विद्यार्थ्यांना लॅपटॉपसाठी १०० टक्के अर्थसहाय करणे या योजना राबविण्यात येणार आहे.सदर योजनेसाठीचे अर्ज nbtribal.in संकेतस्थळावर उपलब्ध आहे. अधिक माहितीसाठी विकास शाखा दूरध्वनी क्र ०७२२६-२२४२१७ वर संपर्क साधावा. अर्ज स्विकारण्याची अंतिम मुदत दि. १५ जुलै २०२५ आहे.प्राप्त ऑनलाईन अर्जाच्या ज्येष्ठतेनुसार संगणीकृत यादी तयार करण्यात येईल. त्यानंतर कागदपत्रे तपासणी करून पात्र, अपात्र अर्जदाराच्या स्वतंत्र याद्या तयार करण्यात येतील. लाभार्थी निवड करताना प्रथम दारिद्र्य रेषेखालील लाभार्थी, अपंग, विधवा, परितक्त्या, निराधार महिलांना प्राधान्याने योजनेचा लाभ देण्यात येणार आहे, असे एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाच्या प्रकल्प अधिकारी प्रियंवदा म्हाडदळकर यांनी कळविले आहे.

## सोमवारी जिल्हा लोकशाही दिन

दि.३१ अमरावती,

जिल्हा लोकशाही दिन सोमवार, दिनांक २ जून २०२५ रोजी दुपारी ११ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित करण्यात आला आहे. तरी संबंधितांनी यावेळी उपस्थित राहावे, असे आवाहन अधिक्षक निलेश खटके यांनी केले आहे.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

शनिवार दि. ३१ मे २०२५ शहर/ग्रामिण


# नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने भरपाई देणार

## महसूल मंत्री तथा पालकमंत्री अमरावती चंद्रशेखर बावनकुळे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१अमरावती–**
जिल्ह्यात एप्रिल आणि मे मध्ये झालेल्या अवकाळी पाऊस आणि वादळाने शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. नुकसान झालेल्या बाधित शेतकऱ्याना तातडीने नुकसान भरपाई मिळवून देण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील.

या बाबत नुकसानीचे पंचनामे तातडीने करण्यात येऊन या बाबतचा प्रस्ताव मंत्रालय स्तरावर सादर करावा, याचा निधी प्राप्त करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने भरपाई देण्यात येणार आहे, अशी माहिती महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.

पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी एप्रिल आणि मे महिन्यात झालेल्या नुकसानीचा आढावा घेतला. बाधितांना तातडीने नुकसान भरपाई व्हावी, यासाठी प्रस्ताव सादर करण्याचे काम तातडीने हाती घेण्यात यावे, असे निर्देश विभागीय आयुक्तांना व






जिल्हाधिकारी यांना दिले आहे.

एप्रिलमध्ये अवकाळी पाऊस आणि वादळामुळे जिल्ह्यातील १ हजार १७४ बाधित गावामधील ७९४ हेक्टर केळी, संत्रा, पपई, कांदा आणि गहू शेतीचे नुकसान झाले आहे. यात अंदाजे २ कोटी ८३ लाख रुपयांचे नुकसान झाले आहे. तसेच मे मध्ये ३२५ गावामधील १३ हजार ६३९ हेक्टर मूग, तिळ, केळी, संत्रा, पपई, कांदा, ज्वारी, लिंबू पिकांचे प्राथमिक अंदाजानुसार नुकसान झाले आहे. या नुकसानीचे पंचनामे करण्याची कार्यवाही सुरू आहे.

मे मध्ये वीज पडून ३ मनुष्य जीवित हानी झाली आहे, तर घरांच्या नुकसानीत एप्रिल मध्ये अंशतः १८ आणि १ घराचे पूर्ण नुकसान झाले आहे. मे मध्ये ७४१ घरांची पडझड झाली असून १४ घरांचे पूर्णतः पडझड झाली आहे. १२ गोठे आणि झोपडीचे नुकसान झाले आहे. मे मध्ये २९ लहान जनावरे आणि १२ मोठे पशूधन मृत झाले आहे. मृत व्यक्तींच्या वारसांना सानुग्रह अनुदान आणि मृत जनावरांच्या मालकांना पशुधन सहाय्य अनुदान वाटपाची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. जिल्हा प्रशासनाने नुकसानीची तीव्रता लक्षात घेऊन, पंचनामे आणि मदत कार्याला गती दिली असून बाधित शेतकऱ्यांना आणि नागरिकांना लवकरात लवकर मदत मिळावी यासाठी प्रशासन पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या कडून निर्देश देण्यात आले आहे .

# शहरातील दवाखान्यांमध्ये सामान्य नागरिकांना सन्मानाची वागणूक द्या

## आ.रवी राणा महापालिकेतील विविध कामांचा घेतला आढावा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१अमरावती**
शहरातील कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावण्यासोबतच महानगर पालिकेच्या दवाखान्यांमध्ये नागरिकांना सन्मानाने वागणूक देण्यात यावी. योग्य वागणूक मिळत नसल्याच्या तक्रार माझ्यापर्यंत येणार नाही यांची खबरदारी घ्या. तक्रार आल्यास कोणाचीही गय केली जाणार नसल्याचे आमदार तथा आश्वासन समितीचे अध्यक्ष रवी राणा यांनी सांगितले. दि. ३०



मे रोजी आढावा बैठकीत ते बोलत होते.पावसाळापूर्वीच्या उपाययोजना करणे अत्यावश्यक आहे. शहरातील सर्व भागातील नाले सफाईचा आढावा घेत त्वरीत साफसफाईचे निर्देश दिले.या बैठकीला मनपा आयुक्त सचिन कलंत्रे, अतिरिक्त आयुक्त – महेश देशमुख, अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, उपायुक्त योगेश पिठे, उपायुक्त नरेंद्र वानखडे, सुनिल राणा,शहराध्यक्ष संजय हिंगासपूरे, नितीन बोरेकर, उमेश ढोणे, महिला अध्यक्षा अर्चना तालन, सचिन भेंडे, नाना आमले, अजय जयस्वाल, व इतर उपस्थित होते.

कलर बॉक्सभातकुली रेल्वे क्रॉसिंगवरील पुल बांधकामाबाबत निर्देश

भातकुली रोड रेल्वे क्रॉसिंग येथील पुल बांधकाम व इतर क्रॉसिंगवरीलरेल्वेच्या कामा संदर्भात निर्णय घेतला. संबंधीत अधिका–यांना अंमलबजावणी करण्याचे निर्देश ले. सुकळी कंपोस्ट डेपो येथील कचऱ्याची विल्हेवाट प्रकल्पाबाबत चर्चा करत अंमलबजावणी करण्याचे निर्देश आ. राणा यांनी दिले.–

## जिल्हाधिकारी कार्यालयातील कर्मचाऱ्यांच्या समुपदेशाने बदल्या

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१अमरावती:**
जिल्हाधिकारी कार्यालयातील विविध संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या प्रशासकीय बदल्या आज करण्यात आल्या आहेत. या बदल्या कर्मचाऱ्यांच्या समुपदेशनाने पार पडल्या.

आज झालेल्या बदलांमध्ये सहायक महसूल अधिकारी ११, मंडळ अधिकारी १२, महसूल सहाय्यक २४, ग्राम महसूल अधिकारी ५४, वाहन चालक ३ यांचा समावेश आहे.

या बदल्या प्रशासकीय कामकाज सुरळीत पार पाडण्यासाठी करण्यात आल्या आहेत, असे

जिल्हाधिकारी कार्यालयाने स्पष्ट केले आहे. या संदर्भातील पुढील कार्यवाही लवकरच सुरू होणार आहे.

# सह दुय्यम निबंधक कार्यालयाची नवीन स्वतंत्र इमारत होणार

## १ करोड ९७ लाख प्रशासकीय मान्यता

### १ करोड ४३ लाख अंदाज पत्रक

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३१अचलपूर:**
६अचलपूर सह दुय्यम निबंधक कार्यालय वर्ग २ परतवाड्यात नेण्याच्या हालचाली सुरूअसताना सदर कार्यालयाला शासनाकडून निधी मंजूर झाल्याने या कार्यालयाची इमारत तहसील कार्यालयाला लागूनच होणार असल्याची माहिती आहे



वर्षाला शासनाच्या तिजोरीत कोटीचा महसूल जमा करणाऱ्या अचलपूर येथील सह दुय्यम निबंधक वर्ग २ कार्यालयाच्या नव्या इमारतीसाठी १कोटी ९७ लाखाची प्रशासकीय मान्यता मिळाली असून अंदाज पत्रक १ कोटी ४३ लाख असल्याची माहिती असून अखेर दहा ते बारा वर्षापासून या कार्यालयाचे रखडलेले बांधकामास लवकरच सुरुवात होणार आहेसध्याच्या जीर्ण व अपुरा इमारती मध्ये कर्मचारी जीव धोक्यात ठेऊन कार्यरत आहे याबाबत या कार्यालयाला स्वतंत्र नवीन इमारत मिळण्यास वारंवार पाठपुरावा अचलपूर येथील नागरिकांनी केला होता आता प्रशासकीय पातळीवरील सर्व बाबी पूर्ण करून १कोटी ४३ लाख रुपयांची निविदा उघडण्यात आली या इमारतीचे बांधकाम लवकरच होणार असल्याने खेरडे यांना वर्क ऑर्डर मिळण्याची शक्यता आहे सध्या हे कार्यालय अत्यंत तोकड्या जागेत आणि धोकादायक स्थितीत कार्यरत आहे इमारतीच्या छताला लाकडी टेकू लावून कर्मचारी आपले कामकाज पार पाडत आहेत नागरिकांना देखील या ठिकाणी येताना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे

> या कार्यालयाची इमारत तोकडी व अपुरी असल्याने सेवा देताना अनेक अडचणी निर्माण होतात नागरिकांची गैरसोय होते तरीसुद्धा प्रशासकीय कामाला गती देण्यात येते आता नवीन इमारतीमध्ये नोंदणी प्रक्रियेत अधिक कार्यक्षमतेने सेवा देता येईल आणि कामकाजातही गती येईल
>
> **– रामदास पाटील सह दुय्यम निबंधक अचलपूर.**

यामुळे नवीन इमारत बांधकाम पूर्ण होतीस्तव तहसील कार्यालय परिसरातील रिकामी असलेली नवीन इमारत तात्पुरत्या स्वरूपात दुय्यम निबंधक अचलपूर कडून तहसील कार्यालयाला दोन वर्षा पासून पत्र दिले असल्याने या कार्यालयासाठी प्रशस्त, आधुनिक व सुरक्षित इमारतीची आवश्यकता भासत आहे शासनाच्या स्तरावरून नवीन इमारतीच्या बांधकामाची १,२ दिवसात सुरुवात होणार असल्याने पुढील वर्षात हे कार्यालय नव्या स्वतंत्र इमारतीत स्थलांतरित होण्याची शक्यता असून नागरिकांसाठी आणि कर्मचाऱ्यांसाठी ही दिलासादायक बाब ठरणार आहे या कार्यालयाचे नवीन इमारत करिता आमदार प्रवीण तायडे यांचे मोलाचे सहकार्य लाभले असून येथील सामाजिक कार्यकर्ता विलास थोरात, गोविंद चरपटे,, अरुण राऊत सह आदींनी पाठपुरावा केला होता.

# रामपुरी कॅंप : १०.४३ लाखांचा गुटखा जप्त

## शहर पोलिसांचा अवैध धंद्यांवर कारवाईचा सपाटा





**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१अमरावती –**
पोलिस आयुक्त अरविंद चावस्यिा यांनी पदभार स्वीकारताच शहर पोलिस दलाने कारवायांचा धडाका – सुरू केला आहे. मागील अनेक महिन्यांपासून शहरात खुलेआम – गुटखा विक्री सुरू आहे. असे असतानाही शहर पोलिसांकडून – अधूनमधून एखादी कारवाई केली जात होती. मात्र मागील चार दिवसांत – शहर पोलिसांनी शहरातील विविध भागात घाड टाकून तिसऱ्यांदा गुटखा पकडला.

गुन्हे शाखेच्या युनिट १ ने गाडगेनगर ठाण्याच्या हद्दीतील रामपुरी कॅम्पमधील एका घरी धाड टाकून १० लाख ४३ हजार ८६० रुपयांचा गुटखा जप्त केला. या प्रकरणी एकाला ताब्यात घेण्यात आले. ही कारवाई शुक्रवार, ३० मे सरोजी दुपारी केली. रामपुरी कॅम्प व येथील रहिवासी राजेश भगवानदास केसवाणी (५०) याने घरातच गुटख्याची मोठ्या प्रमाणात साठवणूक केल्याची माहिती गस्तीवर असलेल्या गुन्हे शाखेच्या युनिट एकला मिळाली. त्यानुसार गुन्हे शाखेच्या युनिट एकने अन्न सुरक्षा अधिकारी गजानन गोरे यांना याबाबत माहिती देऊन राजेश केसवाणी याच्या घरी धाड टाकली. झडतीत घरातील दोन बंद खोल्यांमध्ये १० लाख ४३ हजार ८६० रुपयांचा गुटखा आढळून आला. हा गुटखा जप्त करून राजेश केसवाणीला ताब्यात घेतले. चौकशीत त्याने गुटखा विक्रीकरिता आणल्याचे सांगितले. या प्रकरणी अन्न सुरक्षा अधिकारी गजानन गोरे यांच्या तक्रारीवरून राजेश केसवाणीविरुद्ध गाडगेनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला. ही कारवाई गुन्हे शाखेच्या युनिट एकचे पोलिस निरीक्षक गोरखनाथ जाधव यांच्या नेतृत्वात सपोनि मनीष वाकोडे व योगेश इंगळे व पथकाने केली आहे.

# अकरावीच्या विद्यार्थ्यांची अडचण वाढली; बायोमेट्रिक अनिवार्य

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१अमरावती**
विद्यार्थ्यांची नियमित उपस्थिती वाढवणे, शिष्यवृत्ती, सवलतींसाठी पारदर्शकता आणणे, या उद्देशाने शिक्षण विभागाने राज्यातील कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये अकरावी वर्गासाठी बायोमेट्रिक (आधार आधारित) हजेरी प्रणाली सक्तीची केली आहे. मात्र, बहुतांश विद्यार्थी मोठ्या इन्स्टिटयूटमध्ये शिकवणी लावून एखाद्या छोट्या कॉलेजमध्ये प्रवेश घेतात. अशा विद्यार्थ्यांना बायोमेट्रिक हजेरी चांगलीच अडचणीची जाणार



आहे. यामुळे इन्स्टिटयूट संचालक तसेच विद्यार्थ्यांची डोकेदुखी वाढली आहे.अकरावी व बारावी क्रॅश क्रोर्सच्या नावाखाली सर्वत्र मोठमोठ्या इन्स्टिट्यूट निर्माण झाल्या आहेत. येथे प्रवेश घेतल्यानंतर ते छोट्या–मोठ्या कॉलेजमध्ये त्या विद्यार्थ्यांचा प्रवेश दाखतात. परंतु, आता बायोमेट्रिक हजेरीत हे शक्य नाही. त्यामुळे अडचण वाढणार आहे.विद्यार्थ्यांची हजेरी वाढविण्याच्या अनुषंगाने तसेच पात्र विद्यार्थ्याला शैक्षणिक योजनेचा लाभ देण्याच्या अनुषंगाने थम्ब अटेन्डन्स बंधनकारक केले आहे.

# जिल्हा परिषद शाळांच्या गुरुजींची चिंता वाढली; तक्रार आली की बदली गैरवर्तन मुळीच चालणार नाही: जिल्हांतर्गत बदल्यांच्या धोरणात शासनाने केली सुधारणा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१अमरावती–**
शिक्षकांच्या वर्तनाबाबत तक्रार प्राप्त झाल्यास, शासनाच्या नियमांनुसार, संबंधित शिक्षकांची चौकशी करून त्या शिक्षकांच्या बदलीचा प्रस्ताव विभागीय आयुक्तांना पाठवावा लागणार आहे. त्यानंतर शिक्षकांची बदली करण्यात येणार आहे. याबाबत राज्य शासनाच्या ग्राम विकास विभागाने नवीन शासन निर्णय निर्गमित केला आहे. या निर्णयाने जिल्हा परिषद शाळांच्या शिक्षकांची चिंता वाढली आहे.

शिक्षकांच्या वर्तनाबाबत तक्रार प्राप्त झाल्यास, महाराष्ट्र शासनाच्या नियमांनुसार संबंधित अधिकार्याने ३० दिवसांच्या आत चौकशी करणे आवश्यक आहे. चौकशीनंतर, तक्रार गंभीर आढळल्यास, शिक्षकाची बदली करण्याचा प्रस्ताव राज्य सरकारकडे सादर केला जाऊ शकतो.

### चौकशीमध्ये दिरंगाई नको

तक्रार प्राप्त झाल्यावर, संबंधित अधिकार्याने त्वरित चौकशी सुरू करणे आवश्यक आहे. या चौकशीमध्ये, तक्रारदारांची बाजू, शिक्षकाची बाजू व इतर आवश्यक पुरावे तपासले जातात.

### चौकशी अहवाल

चौकशी पूर्ण झाल्यावर, संबंधित अधिकार्याने अहवाल तयार करणे आवश्यक आहे. या अहवालात, चौकशीचे निष्कर्ष, पुरावे आणि शिक्षकांवरील आरोप स्पष्टपणे नमूद केलेले असावेत, असे शासन निर्णयात नमूद केले आहे.




### ३० दिवसांत करावी लागणार चौकशी

शिक्षकांच्या वर्तनाबाबत तक्रार प्राप्त झाल्यास, चौकशी करणे आणि आवश्यक कार्यवाही करणे अत्यंत आवश्यक आहे. यामुळे शिक्षकांची जबाबदारी वाढते आणि विद्यार्थ्यांचे संरक्षण होते. शिक्षकांच्या वर्तनाबाबत तक्रार प्राप्त झाल्यास, महाराष्ट्र शासनाच्या नियमांनुसार, संबंधित अधिकार्याने ३० दिवसांच्या आत चौकशी करणे आवश्यक आहे.

असा असेल बदली प्रस्तावचौकशीत शिक्षकांविरूद्ध गंभीर आरोप सिद्ध झाल्यास, संबंधित अधिकार्याने शिक्षकाची बदली करण्याचा प्रस्ताव राज्य सरकारकडे सादर करणे आवश्यक आहे. या प्रस्तावात चौकशी अहवाल, शिक्षकांविरूद्धची कोणतीही कारणे बदलीचा प्रस्ताव नमूद केलेला असावा. राज्य सरकार या प्रस्तावाची तपासणी करते त्यानंतर निर्णय होतो.

# अंजनगावात प्रहारचे 'शोले स्टाईल' आंदोलन


## शहरातील अनेक विकासकामे निकृष्ट दर्जाची

### कारवाईसाठी प्रहार आक्रमक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१अंजनगावसूर्जी**

शहरातील विकासकामे निकृष्ट दर्जाची होत आहे. त्यामुळे कामे करणाऱ्यांविरुध्द स्थानिक नगरपरिषदेने कारवाई करावी, या मागणीसाठी प्रहारचे कार्यकर्ते आक्रमक झाले असून, त्यांनी शुक्रवारी पाण्याच्या टाकीवर चढून शोले स्टाईल आंदोलन केले.

स्थानिक नगरपरिषदेमध्ये गेल्या पाच वर्षांपासून प्रशासकराज असून या प्रशासक राजवटीचे मुख्याधिकारी दादाराव डोलारकर शहराचा कारभार सांभाळत आहे. त्यांच्या कार्यकाळात अनेक शहरांतील कामे निकृष्ट दर्जाचे होत असल्याच्या अनेक तक्रारी दिल्यावरसुद्धा कोणत्याही कामाची चौकशी करण्यात आली नाही.त्यामुळे प्रहार संघटनेचे उपजिल्हाप्रमुख शंभू मालठाणे यांच्यावतीने अंजनगाव दर्यापूर राज्य महामार्गावरील पाण्याच्या टाकीवर चढून शोले स्टाईल आंदोलन केले.या आंदोलनात प्रहार संघटनेचे उपजिल्हाप्रमुख शंभू मालठाणे, संदीप देशमुखा, योगेश भालतडक, बाळाभाऊ रोंगे, बाळा शेरकर, आकाश खारोडे, छोटू अढाऊ, सत्यपाल धुमाळे, अमित बोबडे, गोपाल शिंगणे, करण मरस्कोल्हे,प्रशांत बावनधडे, ऋषभधुमाळे, श्याम धुमाळे, रफिक रंगारी, बाळाभाऊ मोहोड, निकेश उंबरकर, बंटी इंगळे, संजय चोरे या कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.



आंदोलनाला तहसीलदार पुष्पा सोळंके, ना तहसीलदार रवींद्र काळे, नगरपरिषदेचे उपमुख्याधिकारी गोविंद त्रिपुरारी यांच्यासह अनेक अधिकाऱ्यांनी आंदोलन कर्त्यांची मनधरणी करुन आंदोलन सोडविण्याचे प्रयत्न केलेः मात्र जोपर्यंत निकृष्ट दर्जाचे झालेल्या कामाची चौकशी समिती नेमण्यात येणार नाही, तोपर्यंत आंदोलन सुरूच ठेवण्याचा निर्धार कार्यकर्त्यांनी केला.

## महाराजस्व समाधान शिबिराचा १६५ नागरिकांनी घेतला लाभ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१भातकुली**

येथील ग्रामपंचायतीत छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर आयोजित केले होते. या शिबिरात नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवून आपल्या समस्या, तक्रारी आणि अर्ज सादर केले. अनेक प्रलंबित प्रकरणांना या निमित्ताने मार्ग मिळाला. शिबिरात विविध उपक्रमांचा १६५ लाभार्थ्यांनी लाभ घेतला. या शिबिराला आमदार राजेश वानखडे उपस्थित होते.

या शिबिरात महसूल, कृषी, आरोग्य, सामाजिक कल्याण आदी विभागांच्या विविध योजनांचा लाभ नागरिकांना देण्यात आला. सर्व संबंधित विभागांचे अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित राहून कार्य तत्परतेने पार पाडण्यात आले.शिबिरात प्रामुख्याने रहिवाशी, उत्पन्न, जात प्रमाणपत्रे, रेशन कार्ड वाटप, पीएम किसान योजना, संजय गांधी निराधार योजना, श्रावण बाळ योजना, घरकुल लाभार्थ्यांना रेती रॉयल्टी प्रमाणपत्र, जिवंत सातबारा, फेरफार नोंदी, कृषी व आरोग्य योजनांचा लाभ असे अनेक कामकाज पार पडले. तसेच आरोग्य विभागामार्फत पाच लाखांपर्यंत आरोग्य कार्ड देण्यात आले.

# धा. रेल्वेच्या ग्रामीण रुग्णालयात रुग्णांच्या जिवाशी खेळ : तज्ज्ञ डॉक्टरांचे दुर्लक्ष

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१धामणगाव रेल्वे :**

शहरातील ग्रामीण रुग्णालयाची जबाबदारी असलेल्या तज्ज्ञ डॉक्टरांनी शहरातच आपापली दुकानदारी थाटल्याने ग्रामीण रुग्णालय ओस पडले आहे. मागील काही वर्षात येथील काही वैद्यकीय अधिकाऱ्यांनी आपले खाजगी दवाखाने उभारून ग्रामीण रुग्णालयात मात्र त्यांच्या जागेवर तज्ज्ञांऐवजी भलतेच बाह्यरुग्ण विभाग सांभाळत असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.





शहरातील ग्रामीण रुग्णालयात वैद्यकीय अधीक्षकांसह चार एमबीबीएस डॉक्टरांवर बाह्यरुग्ण, आंतररुग्ण व अपघात विभागाची जबाबदारी आहे. तालुक्यात ग्रामीण व शहरी भागात असंसर्ग व संसर्गजन्य आजारावरील बहुतांश रुग्ण ग्रामीण रुग्णालयात बाह्यरुग्ण विभागात येऊन उपचार घेतात. परिसरात घडणाऱ्या अपघातांच्या घटना, गळफास, सर्पदंश, विषबाधेचे किंवा अचानक विविध गुन्ह्यातील आलेल्या गंभीर जखमीना तत्काळ उपचाराची गरज असते. त्यासाठीच शासकीय रुग्णालयामध्ये शासनाकडून चोवीस तास सेवा देणाऱ्या तज्ज्ञ डॉक्टरांची नेमणूक केलेली आहे; मात्र शासनाच्या पगारासोबत खाजगीतील माया जमवता यावी, यासाठी येथील पगारी वैद्यकीय अधिकाऱ्यांनी आपली स्वतः चे दवाखाने उभारले आहेत.

दरम्यान आंतर व बाह्यरुग्ण सांभाळण्यासाठी या डॉक्टरांनी प्रत्यक्ष स्वतः कर्तव्यावर न थांबता बीएएमएस, बीएचएमएस, शाळा आरोग्य तपासणी पथक, युनानी आयुष भारत योजनेतील आरोग्य अधिकाऱ्यांना आपल्या जागेवर ठेवल्याची गंभीर बाब समोर आली आहे. त्यामुळे अनेकदा तज्ज्ञ डॉक्टरांकडून उपचार न मिळाल्याने रुग्णाच्या जीविताला धोका निर्माण झाल्याची वास्तविकता समोर आल्याने डबल इन्कम मिळवण्याच्या नादात या डॉक्टरांनी ग्रामीण रुग्णालयात येणाऱ्या गोरगरीब जनतेच्या जीविताशी खेळ चालवला आहे. सदर गंभीर प्रकारात नव्याने रुजू झालेल्या वैद्यकीय अधीक्षक कांचन रहांगडाले यांचा सुद्धा सिंहाचा वाट असल्याचे दिसून येत असून गुरुवार व शुक्रवार त्यांची जबाबदारी असताना गुरुवारी त्या गैरहजर होत्या. त्यांच्या बदल्यात डॉ. भूषण थोरात यांच्यावर जबाबदारी दिल्याची माहिती मिळालीः मात्र प्रत्यक्षात तेसुद्धा हजर नव्हते, तर त्यांच्या बदल्यात राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमांतर्गत नेमणूक असलेल्या कांचन अग्रवाल यांनी दिवसभर येणाऱ्या रुग्णांना उपचार दिले

यावेळी विषबाधेचे व इतर आकस्मिक आजाराचे रुग्ण त्यांनी हाताळले. वैद्यकीय अधीक्षक कर्तव्यावर नाहीत, तर कुठे आहेत व नाहीत तर मग वैद्यकीय अधीक्षक करतात तरी काय? हा प्रश्न उपस्थित होत आहे. यासंदर्भात माहिती मिळवण्याचा प्रयत्न केला असता जाणीवपूर्वक टाळाटाळ करण्यात आली. मागील काही वर्षात येथील तज्ज्ञ डॉक्टरांनी आपली दुकाने थाटून शासनाची दिशाभूल केली आहे. दरम्यान शहरात स्वतः चे मोठमोठी दुकाने उभारून रुग्णसेवेच्या कायद्यांचे उल्लंघन करणाऱ्या व सामान्य जनतेच्या जिवाशी खेळणाऱ्या या अधिकाऱ्यांवर आरोग्य विभाग काय कारवाई करते, याकडे जनतेचे लक्ष लागले आहे.

## राजमाता अहिल्यादेवी होळकर जयंती उत्साहात साजरी; वृक्षारोपण व अभिवादनाने व्यक्त केली आदरांजली



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१अमरावती**

पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांची ३०० वी जयंती अमरावती शहरासह ग्रामीण भागात विविध उपक्रमांद्वारे साजरी करण्यात आली. वलगाव येथील श्री गाडगे महाराज वृध्दाश्रमात वृक्षारोपण, तर शासकीय कार्यालयांमध्ये प्रतिमापूजन व अभिवादन कार्यक्रम झाले.वलगाव येथील श्री गाडगे महाराज मिशन, मुंबई संचलित वृध्दाश्रमात जयंतीनिमित्त वृक्षारोपण करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात प्रतिमापूजनाने झाली. डॉ. कैलास बोरसे यांनी अहिल्यादेवींच्या समाजकार्याची उपस्थितांना माहिती दिली. यावेळी पोलीस निरीक्षक वैभव पानसरे, सरपंच सुधीर उगले, गजानन राठोड, सावन गवई, श्रीकृष्ण पखाले यांच्यासह विविध मान्यवरांची उपस्थिती होती. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत वृक्षारोपण करण्यात आले.दरम्यान, विभागीय आयुक्त कार्यालयात आयुक्त श्वेता सिंघल यांनी प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. अपर आयुक्त रामदास सिध्दभट्टी, अजय लहाने, संतोष कवडे, प्रज्ञा काकडे आदी उपस्थित होते.जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या हस्ते जयंती साजरी करण्यात आली. यावेळी अनिल भटकर व विजय लोखंडे उपस्थित होते. सर्वांनी अहिल्यादेवींना पुष्प अर्पण करून त्यांच्या कार्यास मानवंदना दिली.

# मुंबईच्या बांद्रा परिसरात गुंजले चौसाळ्याच्या कडू महाराजांचे स्वर

## वारकरी प्रबोधन महासमितीकडून हभप अविनाश कडू यांचा सत्कार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१अचलपूर**

श्री संत आदिशक्ती मुक्ताबाई यांच्या अंतर्धान समाधी सोहळाव श्री संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या अवतीर्ण उत्सवाचे सप्तशतकोत्तर सुवर्णमहोत्सवी वर्ष तसेच जगद्गुरु तुकाराम महाराज यांचा वैकुंठ गमनाच्या त्रिशतकोत्तर अमृत महोत्सव वर्षाच्या औचित्यावर मुंबई बांद्रा (पूर्व) येथील संत ज्ञानेश्वर महाराज मंदिर शासकीय वसाहत बांद्रा (पूर्व) येथे वारकरी प्रबोधन महासमिती व महाराष्ट्र वारकरी मंडळाचे अध्यक्ष हभप रामेश्वर महाराज शास्त्री यांच्या मार्गदर्शन व नियोजनामध्ये ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा व संपूर्ण महाराष्ट्रील कीर्तनकारांच्या नामांकित कीर्तनसेवा आयोजित करण्यात आल्या होत्या.



त्यामध्ये संत मुक्ताई समाधी सोहळ्याच्या दिवसाची सेवा अचलपूर तालुक्यातील युवा कीर्तनकार व श्री संत गजानन महाराज चरित्र कथाकार हभप अविनाश महाराज कडू यांची आयोजित करण्यात आली होती.कडू महाराजांनी प्रामुख्याने श्री संत गजानन महाराज, ज्ञानेशकन्या श्री संत गुलाबराव महाराज, कर्मयोगी संत गाडगेबाबा या विदर्भातील संतांच्या चरित्रावर प्रकाश टाकून उपस्थित श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले.

श्रोत्यांमध्ये मंत्रालयातील अनेक उच्चपदस्थ अधिकारी, वैद्यकीय क्षेत्रातील नामांकित, तसेच शेकडो पारमार्थिक साधक उपस्थित होते.

कीर्तनानंतर रामेश्वर महाराज शास्त्री यांनी कडू महाराजांचे कौतुक करून युवा कीर्तनकार यांची महाराष्ट्राला गरज असल्याचेही ते म्हणाले. त्याचबरोबर कार्याबद्दलही काढले. वारकरी महाराजांच्या गौरवोद्गार प्रबोधन महासमिती महाराष्ट्र राज्य यांच्या सदस्यांनी कडू महाराजांचा शाल श्रीफळ देऊन सत्कार केला. मुंबईसारख्या मायानगरीमध्ये झालेल्या कीर्तनसेवेबद्दल महाराजांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## दर्यापूर शहर अस्वच्छतेच्या विळख्यात



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१दर्यापूर**

मे महिन्यातच मुसळधार पाऊस बरसल्याने दर्यापूर शहरात सर्वत्र अस्वच्छता आहे. दर्यापूर शहरात ठिकठिकाणी उपल्धावरच कचरा पहला असून त्याची सर्वत्र दुर्गंधी मोठ्याप्रमाणात पसरत आहे.

गेल्या अनेक वर्षापासून दर्यापूर शहरातील समस्या या नित्याच्याचं बनल्या आहेत. दर्यापूर शहराला कुणी वाली नसल्यासारखे चित्र सर्वत्र आढळून येत आहे. शहरात साचलेल्या पाण्याची विल्हेवाट न लावल्यामुळे आरोग्यविषयक तक्रारी दिवसेंदिवस वाढत चालल्या आहेत. साचलेल्या पाण्यात डासांची उत्पत्ती होऊन रोगांचा प्रसार झपाट्याने होत आहे.

कोरोनासारख्या महामारीने डोके वर काढले असतानासुद्धा दर्यापूर शहरात कुठल्याही प्रकारची फवारणी करण्यात आली नाही संबंधित विभाग केवळ नावापुरता शिल्लक राहिला आहे. डासाचा प्रादुर्भाव दर्यापूर शहरात वाढता असून त्यावर प्रतिबंध घालण्यासाठी दर्यापूर पालिका ही पूर्णपणे अपयशी ठरली आहे

दर्यापूर शहरातील सांगळुकरनगर,नागरिकांच्या आरोग्यविषयक समस्या वाढल्या

पालिका प्रशासनाला केव्हा जाग येईल?पंजाबराव कॉलनी, जागृती कॉलनी, ड्रीमलेंड सिटी, अवधूत नगर, हिंगणी रोड परिसर हा परिसर अद्यापही विकासकामांपासून कोसोदूर असून संबंधित विभागाचे अधिकारी, कर्मचारी या गंभीर समस्येकडे पाठ फिरवत आहेत. एकंदरीत बघता संबंधित विभाग लोकप्रतिनिधी याचे शहराकडे पूर्णपणे दुर्लक्ष झाले असून नागरिकांचा लोकप्रतिनिधीवर तीव्र रोष व्यक्त केला.

# बनावट जन्म दाखला प्रकरणाच्या चौकशीला गती

## डॉ. किरीट सोमय्या यांनी घेतला तिवसा रुग्णालयातून जन्म-मृत्यू नोंदीचा आढावा : उपरुग्णालयातील कामकाजाबद्दल केली प्रशंसा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१तिवसा**

बांगलादेशी आणि रोहिंग्या घुसखोरांना स्थानिक नागरिकत्व मिळविण्यासाठी मोठ्या प्रमाणात बनावट दाखले वापरले जात असल्याच्या कारणास्तव भारतीय जनता पक्षाचे नेते व माजी खासदार डॉ. किरीट सोमय्या यांनी या तपास कार्यवाहीस गती देत तहसील स्तरावर चौकशी सुरु करण्यात आली आहे. चौकशीचा भाग म्हणून ३० मे रोजी तिवसा ग्रामीण रुग्णालयातून जन्म-मृत्यू नोंदीबाबतचा आढावा घेण्यात आला.



डॉ. किरीट सोमय्या यांनी तिवसा ग्रामीण रुग्णालयामधून एक जानेवारी २०२४ ते ३१ डिसेंबर २०२४ आणि १ जानेवारी २०२५ ते २५ मे २०२५ पर्यंत टर्मिनलद्वारा भारत सरकारच्या जन्म-मृत्यूची नोद पोर्टलवर एक वर्षापेक्षा मोठे उशिराचे जन्म व मृत्यू नोंदणी किती झाल्या, यानोंदीबाबतची माहिती माहितीचा अधिकार २००५ अन्वये मागितली होती. यासंदर्भात तिवसा ग्रामीण रुग्णालयात डॉ. किरीट सोमय्या माजी खासदार यांच्या प्रमुख उपस्थितीत वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी यांच्या उपस्थितीत आढावा घेण्यात आला. यावेळी उपजिल्हारुग्णालयाच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांनी जन्म-मृत्यू नोंदींचा तपशीलवार अहवाल डॉ. किरीट सोमय्या यांना सादर केला.

या आढावा बैठकीदरम्यान तिवसा ग्रामीण रुग्णालयातील प्रभारी वैद्यकीय अधिकारी डॉ. योगेश तलमले, डॉ. गौरव विधळे, डॉ. विकास जायभाये, अधिपरिचारिका सोनल ठाकूर, सचिन गायकवाड, बबिता बागडे, योगिता खोपे, संदेश टाकसांडे, सतीश रंगारी, अजहर काजी, गीता खेडकर, शारदा लोखंडे, सविता मेंढे, मालती बेले, विशाल शापामोहन, सपना भिसे, प्रणाली मानकर, अश्विनी तिजारे, निलेश वऱ्हाडे यांच्यासह वैद्यकीय अधिकारी आणि संबंधित कर्मचारी उपस्थित होते.या आढावा बैठकीदरम्यान किरीट सोमय्या यांनी तिवसा रुग्णालयाच्या कार्यपद्धतीचे आणि पारदर्शक कामकाजाबाबत प्रशंसा केली.

## लग्नाची पत्रिका दिली नाही, वधुमंडपी जाऊन घातला धुडगूस

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१धा. रेल्वे**

आमच्या वडिलांना लग्नाची पत्रिका का दिली नाही, अशी विचारणा करत तीन सख्ख्या भावांनी वधुमंडपी जाऊन धुडगूस घातला. भोजनास बसलेल्या पाहुण्यांना पंगतीतून उठवून दिले. तथा अन्नाची लाथेने फेकफाक करून नासाडी केली. ते एवढ्यावरच थांबले नाहीत, तर त्यांनी वधुपित्याला तू धामणगावला भेट, तुला जीवाने मारून टाकतो, अशी गर्भित धमकी दिली. २८ मे रोजी सायंकाळी धामणगाव रेल्वे तालुक्यातील गव्हा निपाणी येथे ती घटना घडली.याप्रकरणी, मंगरूळ दस्तगीर पोलिसांनी एका ५५ वर्षीय गृहस्थाच्या तक्रारीवरून प्रशांत अरुण बावनकुळे, वैभव अरुण बावनकुळे, आशिष अरुणबावनकुळे आणि अन्य एक (सर्व रा. धामणगाव रेल्वे) यांच्याविरुध्द पोलिसांनी २९ मे रोजी पहाटे गुन्हा दाखल केला. एफआयआरनुसार,फिर्यादीच्या मुलीचे २४ मे रोजी लग्न होते. या लग्नाची पत्रिका त्यांनी जवळचे नातेवाईक असलेले अरुण बावनकुळे यांना दिली नाही. त्यामुळे अरुण बावनकुळे यांचा मुलगा प्रशांत व त्याचा एक सहकारी २८ मे रोजी त्या लग्नघरी पोहचले. तेथे माझ्या वडिलांना लग्नाची पत्रिका का दिली नाही, अशी विचारणा त्याने केली. त्याव फिर्यादी तथा वधूपित्याने त्याला 'माझ्या मुलीचे लग्न आहे, मी कोणालाही पत्रिका देईल. तुला काय करायचे, असे उत्तर दिले. त्यावेळी प्रशांत व त्याच्या सोबत असलेल्या तरुणाने त्याच ठिकाणी बसलेल्या पंगतीतील पाहुण्यांना उठवून दिले, तसेच अन्नाची नासधूस केली. त्यानंतर काही वेळातच आशिष व वैभव बावनकुळे हे दोघे भाऊ आलेत व त्यांनीसुध्दा त्याच कारणावरुन वधुपित्याला शिवीगाळ करुन जीवानेमारुन टाकण्याची धमकी दिली.

# जिल्हा शोध व बचाव पथकाकडून मॉकड्रिल...





मान्सून कालावधीत उद्भवणाऱ्या नैसर्गिक व मानवनिर्मित आपत्ती व पूर परिस्थितीचा सामना करण्यासाठी जिल्हा शोध व बचाव पथक तसेच महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाद्वारे शुक्रवारी शहरातील छत्री तलाव येथे मॉकड्रिल करण्यात आले. शहरासह ग्रामीण भागात अचानक पूरपरिस्थिती आल्यास पाण्यापासून बचावाकरिता कुठलेही साहित्य वापरता येईल याचे प्रात्यक्षिकदेशील यावेळी करून दाखविले. यावेळी महापालिका आयुक्त सचिन कलंत्रे, निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर यांनी बचाव पथकांकडून माहिती जाणून घेतली. सुरक्षेच्या दृष्टीने सर्व उपाययोजना सज्ज ठेवण्याच्या सूचना यावेळी देण्यात आल्या.

# वर्ध्यातून एकाचवेळी नव्या दोन गाड्या, एक दक्षिणेत एक पुण्यात; तीन व्याघ्र प्रकल्प दर्शन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१वर्धा**

सर्वाधिक पसंतीचा प्रवास म्हणजे रेल्वे. सोयीचा व कमी खर्चाचा अशी चर्चा होणारा. पण त्यात आरक्षण मिळणे पण तेवढेच कठीण, हा सार्वत्रिक अनुभव. म्हणून नव्या गाड्या सोडण्याची नेहमी मागणी होते. वर्धा ते पूणे हा असाच व्यस्त मार्ग. संगणक उद्योगातील चाकरमानी, त्यांचे आप्त व अन्य असे पुण्यात रोज धाव घेत असतात. पण आरक्षण मिळत नाही म्हणून ओरड असते. काही तरी करा, असा तगादा नेहमी असतो. या अनुषंगाने वर्धा पुणे अशी व्हाया गाडी सूरू होणार. ती पण अद्यावत सुसज्ज कोच असणारी. रेल्वे मंडळाचे विशेष सदस्य प्रणव जोशी यांनी ही माहिती सांगितली.



वर्धा येथून पूणे जाण्यासाठी रिवा – गोंदिया – पूणे ही नवीन रेल्वे सेवा सूरू करण्याचा निर्णय रेल्वे मंत्रालयाने घेतला आहे. वर्धा येथून दर बुधवारी सायंकाळी साडे सात वाजता निघणार व गुरुवारी सकाळी पावणे दहा वाजता पुणेत पोहचणार. पूणे येथून दर गुरुवारी दुपारी सव्वा तीन वाजता सुटणार व वर्ध्यात पहाटे साडे चार वाजता पोहचणार. या रेलमूळे वर्धा स्थानक सतना, कटणी, जबलपूर, नैनपूर, बालाघाट, गोंदिया सोबत जोडले जाणार आहे. दुसरी गाडी सेवाग्राम येथून बांगलुरू व ग्वाल्हेर या ठिकाणी जाण्यासाठी ग्वाल्हेर सेवाग्राम व बांगलुरु ही नवीन सेवा सूरू होणार. सेवाग्राम येथून बंगरुलु येथे जाण्यासाठी दर शनिवारी सकाळी सात वाजता ही गाडी नियोजित आहे. सेवाग्राम येथून ग्वाल्हेर येथे दर सोमवारी दुपारी अडीच वाजता राहील. या नव्या सेवेमुळे मध्यप्रदेश, महाराष्ट्र व कर्नाटक या राज्यातील अनेक रेल्वे स्थानक वर्धा जंक्शन सोबत जोडल्या जातील.

प्रणव जोशी म्हणतात की हे मार्ग वन्यजीव प्रेमी नागरिक यांना आनंद देणारा ठरणार. सतना, बांधवगड व पन्ना असे तीन व्याघ्र प्रकल्प या मार्गावर लागतात. एकाचवेळी तीन व्याघ्र प्रकल्प वर्धेकर व अन्य जिल्ह्यातील भारतीयांना अनुभवता येणार, हा मोठा आनंदच. तसेच पूणे गाडी ही सुपर फास्ट राहणार. म्हणजे वर्धा येथून ती सुसाट पळणार . भुसावळ व काही मोजकीच स्थानके त्यानंतर आहेत. २० कोचची गाडी सर्व श्रेणीसह आहे. दोन सामान्य डब्बे राहतील. हे कोच पण अत्याधुनिक असणार आहेत, असे प्रणव जोशी सांगतात.

# भातकुली तालुक्यात जनावर चोरांची टोळी सक्रिय, ग्रामस्थांत भीतीचे वातावरण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१अमरावती**

भातकुली तालुक्यातील वंडली गावात जनावर चोरांची टोळी सक्रिय झाली असून, गेल्या काही दिवसांत १५ हून अधिक जनावरे चोरीस गेले आहेत. या चोरीच्या घटनांमुळे संपूर्ण परिसरात भीतीचं वातावरण निर्माण झालं आहे. काल रात्री घडलेली चोरी गावातील पोलिस पाटील



कैलास औगड यांच्या घरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली. यात चोरटे चारचाकी वाहनातून जनावरे चोरून नेत असल्याचं स्पष्टपणे दिसून आलं आहे. या फुटेजमुळे चोरीच्या घटनांना गांभीर्य प्राप्त झालं असून, पोलिस प्रशासनावर दबाव वाढला आहे. सध्या पेरणीपूर्व काळ सुरू असल्याने शेतकऱ्यांसाठी बैल व इतर जनावरे अत्यंत महत्त्वाची आहेत. मात्र, ही चोरीची मालिका सुरूच असल्याने शेतकरी वर्गामध्ये अस्वस्थता वाढली आहे. या चोऱ्यांना आळा घालण्यासाठी पोलिसांनी तातडीने कारवाई करावी, अशी मागणी ग्रामस्थ व शेतकऱ्यांकडून होत आहे. गावांमध्ये गस्त वाढवावी व सीसीटीव्हीची तपासणी करून चोरट्यांचा लवकरात लवकर बंदोबस्त करावा, अशी स्थानिकांची अपेक्षा आहे.

# अमरावती शहरात तिसऱ्या दिवशीही वर्तमानपत्रांचे वितरण ठप्पच; 'व्हीडीएनए' ने वृत्तपत्र विक्रेत्यांची मागणी फेटाळली

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि३१ अमरावती**

नागपूर व स्थानिक पातळीवरील प्रकाशित वर्तमानपत्राचे व्यवस्थापन आणि मालक तसेच अमरावती वृत्तपत्र विक्रेता असोसिएशन यांच्यात दोन दिवसांपासून वृत्तपत्र विक्रीवरील कमिशनच्या मुद्द्यावरून गुरूवारपासून (ता. २९) सुरू झालेला तीन दिवसीय संप आ तिसऱ्या दिवशी कायम राहिला. परिणामी प्रादेशिक व स्थानिक वर्तमानपत्राचे वितरण ठप्प होते. दरम्यान नागपूर येथे दि विदर्भ डेली न्यूजपेपर्स असोसिएशनची (व्हीडीएनए) तसेच स्थानिक पातळीवर वर्तमानपत्र व्यवस्थापनाची बैठक पार पडली. मात्र या बैठकीत व्हीडीएनए आणि स्थानिक वर्तमानपत्र आपल्या भूमिकेवर ठाम राहिले. वृत्तपत्राच्या वितरणाअभावी झालेल्या नुकसानाची विक्रेत्यांनी भरपाई द्यावी, त्याशिवाय वर्तमानपत्र वितरणासाठी दिले जाणार नाही, अशी भूमिका वृत्तपत्र



व्यवस्थापनांनी घेतली तर, एका अंकावर २ रुपये १० पैसे कमिशन मिळाले नाही तर संप मागे घेणार नाही, अशी भूमिका विक्रेत्यांनी कायम ठेवलेली आहे. या पार्श्वभूमीवर तिसऱ्या दिवशी ही नागरिकांच्या घरात वृत्तपत्र पोहचले नाही.

ग्राहकांपर्यंत पोहोचविल्या जाणाऱ्या प्रति वर्तमानपत्रावर २ रूपये १० पैसे कमिशन देण्यात यावे, पुरवणी अंकात टाकून द्यावी, या दोन प्रमुख मागण्यांसाठी अमरावती वृत्तपत्र विक्रेता असोसिएशनने गुरुवारपासून (ता. २९) अमरावती शहरात तीन दिवसीय संप पुकारला आहे. या प्रकारामुळे गत तीन दिवसांपासून शहरात वाचकांपर्यंत वर्तमान पोहोचविणे ठप्प झालेले आहे. या पार्श्वभूमीवर नागपूर येथे दि विदर्भडेली न्यूजपेपर्स असोसिएशनची बैठक गुरुवारी (ता. २९) दुपारी २ वाजता पार पडली. अमरावतीत वर्तमानपत्राचे वितरण न झाल्याबाबत चर्चा करण्यात आली. वर्तमानपत्रांची किंमत आणिकमिशन यात सध्या कोणताही बदल करण्यात येणार नाही, असे सर्वानुमते ठरविण्यात आले. पुढील निर्णयापर्यंत अमरावती येथील एजंटांच्या मागणीनुसार अंकांचा पुरवठा करावा. याबाबतीत पुढेही व्हीडीएनएचा निर्णय अंतिम असेल, असे या बैठकीत ठरविण्यात आले.

# आर्थिक कोंडीत सापडलेल्या शेतकऱ्यांभोवती यंदा आवळणार अवैध सावकारीचा फास

## शेतीसाठी सुरू आहे पैशाची जुळवाजुळव : अवैध सावकार व एजंट गावांमध्ये झाले सक्रिय

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१अमरावती**

यंदा पीक कर्जाचा टक्का घसरल्याने शेतीसाठी पैशाची जुळवाजुळव कशी करावी, ही विवंचना अनेक शेतकऱ्यांसमोर उभी ठाकली आहे. ऐन शेतीच्या हंगामात अर्थकोंडीत सापडलेल्या अशा शेतकऱ्यांना अवैध सावकारीने फास टाकणे सुरू केले. जिल्हा प्रशासनाने याविरुद्ध कडक भूमिका घेतली नाही, तर हा फास यंदा आवळला जाऊ शकतो, अशी भीती काही जागरूक शेतकऱ्यांनी वर्तविली आहे.



अमरावती जिल्ह्यातील शेतकरी खरीप हंगामाच्या तयारी लागले. यंदा मान्सूनचे लवकर आगमन झाल्याने मशागतीच्या कामाची शिवारात लगबग दिसून येत आहे. बरेच शेतकरी पीक कर्जावर अवलंबून असतात. जिल्हा बँकेने यंदा पीक कर्ज वाटपात आघाडी घेतली. मात्र, राष्ट्रीयीकृत बँकांचा आडमुठेपणा यंदाही दिसून आला, असा शेतकऱ्यांचा आरोप आहे. पाच ते दहा एकर शेती असणाऱ्या बरेच शेतकरी कशीबशी पैशाची तजवीज करून ठेवतात. मात्र, अल्पभूधारक शेतकऱ्यांना इतरांसमोर हात पसरावे लागत असल्याचे चित्र आहे.

**पीक कर्ज वितरण व्हावे सुलभ**

अशा संकटग्रस्तांना शोधून दामदुपट व्याजाने कर्ज देणारे अवैध सावकार व त्यांचे एजंट गावागावांत सक्रिय झाल्याची माहिती पोंभुर्ण्यातील एका शेतकऱ्याने दिली. महाराष्ट्र सावकारी (नियमन) अध्यादेश २०१४ नुसार परवानाधारक सावकारांना काही अटी व नियम आहेत. सावकारी परवान्याचा कालावधी आता १ एप्रिल ते ३१ मार्च या मुदतीत ठेवण्यात आला आहे. नियम व अटींच्या अधीन राहून परवानाधारक सावकाराकडून कर्ज घेणे वाईट नाही. परंतु, नियम धाब्यावर जिल्ह्यात काही ठिकाणी अवैध सावकारी सुरू झाल्याचा शेतकऱ्यांचा आरोप आहे. यावर पीक कर्ज वितरणाची प्रक्रिया पुन्हा सुलभ करणे, हा पर्याय असल्याचे शेतकरी प्रकाश साबळे यांचे म्हणणे आहे.

# आमच ठरलं.....






आगामी महानगरपालिका,जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकी संदर्भात युवा स्वाभिमान पक्षाची अतिशय महत्वाची बैठक आ. रवि राणा यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.या बैठकीत अनेक महिला कार्यकर्त्यांनी,युवकांनी युवा स्वाभिमान पक्षात रीतसर प्रवेश केला.त्यानंतर आ.रवी राणा यांनी युवा स्वाभीमानचे पदाधिकारी,कार्यकर्ते यांना मार्गदर्शन करीत महापालिका ,जिल्हा परिषद,पंचायत समिती निवडणुका संदर्भात सविस्तर चर्चा ही केली आणि कार्यकर्त्यांना कानमंत्र ही दिला.

# महाराष्ट्रसह चार राज्यात हिवताप नियंत्रणाचा नवीन फार्मुला स्थानांतरीत नागरिकांवर...

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१नागपूर**

महाराष्ट्रासह शेजारील तेलंगणा, छत्तीसगड आणि मध्यप्रदेश या चार राज्यातील आरोग्य विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी त्यांच्या राज्यात हिवतापासह किटकजन्य आजार नियंत्रणाचा नवीन फॉम्युला तयार केला आहे. त्यानुसार नवीन माणक प्रणाली तयार करून त्याची अंमलबजावणी केली जाणार आहे.

नागपुरातील हॉटेल प्राईड येथे चारही राज्यातील आरोग्य विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांची शुक्रवारी बैठक झाली. त्यात नवीन माणक प्रणालीवर एकमत झाले. बैठकीला आरोग्य विभागाच्या पूणे कार्यालयातील सहसंचालक डॉ. बबीता कमलापूरकर, नागपुरातील आरोग्य उपसंचालक डॉ. शशिकांत शंभरकर आणि इतरही चारही राज्यातील अधिकारी उपस्थित होते. बैठकीत किटकजन्य आजाराची उच्च जोखीम असलेल्या भागात आजार प्रतिबंध आणि नियंत्रणासाठी समन्वय वाढविणे आणि धोरणे मजबूत करण्याचा निर्णय झाला.

बैठकीत नवीन माणक प्रणालीनुसार चारही राज्यातील



इतर राज्यात जनतेच्या स्थलांतरासाठी मार्गदर्शक सुचना कार्यान्वीत करणेवर एकमत झाले. त्यानुसार चारही राज्यातून एक-मेकांच्या राज्यात स्थलांतरीत होणापूर्वी कामगार, भटकी जमातीसह नागरिकांची माहिती एक मेकांना देत त्यांची हिवताप तपासणी करणे, स्थानांतरीत झालेल्या व्यक्तींचीही तपासणी करणे. त्यात कुणाला हिवताप वा किटकजन्य आजार आढळल्यास तातडीने त्यावर उपचार करण्याचा निर्णय झाला. दरम्यान या कामगारांवर लक्ष ठेवत कुणाची प्रकृती बिघडल्यास त्यावरही विशेष लक्ष ठेवण्यावर एकमत झाले.

आवश्यकतेनुसार आरोग्य कर्मचाऱ्यांसाठी प्रशिक्षण तथा क्षमता बांधणी करणे, राज्य सीमावर्ती भागातील लोकांमध्ये मोठया प्रमाणात किटकजन्य आजारासह हिवतापाबाबत जनजागृती करणे, गंभीर किटकजन्या आजाराचे प्रामुख्याने हिवतापाच्या रुग्णाच्या उपचाराचे व्यवस्थापन करणे, राज्य सीमावर्ती भागातील अधिकाऱ्यांसोबत समन्वयाने काम करणे, विविध शासकीय, निमशासकीय विभागाशी तसेच सामाजीक संस्था, सेवाभावी संस्था यांची योग्य पध्दतीने समन्वयाने मदत घेणे, आप- आपलया राज्यातील स्थानिक हिवतापाचा प्रसार थांबवा आणि हिवतापाचे रुग्ण शुन्यावर आणण्यासाठी स्थानिक स्तरावर प्रयत्न करणे, सीमापार अधिकाऱ्यांच्या भूमिका आणि जबाबदाऱ्या निश्चीत करण्याचाही मुद्दा नवीन माणक प्रणालीमध्ये समाविष्ट करण्यात आला. बैठकीत वर्ष २०२७ पर्यंत एकत्रित प्रयत्नांनी मलेरिया निर्मूलन साध्य करण्यासाठी ही बैठक खूप महत्त्वाची ठरणार असल्याचे मत आरोग्य विभागाकडून व्यक्त केले गेले. त्यामुळे आता महाराष्ट्रासह शेजारील तेलंगणा, छत्तीसगड आणि मध्यप्रदेश या चार राज्यात या नवीन माणक प्रणाणीची अंमलबजावणी कशी होणार ? याकडे सगळ्यांचे लक्ष लागले आहे.

